# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २५ जून, २०१९ / आषाढ ४, १९४१ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण मंत्री**
**(३) कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री**
**(४) कामगार मंत्री**
**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

### ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींबाबत

**(१) * १३५९३९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ४७०४ धोकादायक इमारतींमध्ये सुमारे ४५ हजार कुटुंबे वास्तव्यास असून यातील अनेक इमारती अतिधोकादायक असल्याची बाब माहे मे, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंब्रा, धूम कंपाऊंड परिसरात दिनांक २८ डिसेंबर, २०१८ रोजी असीफा इमारत खचली होती, ठाणे येथे दिनांक २३ एप्रिल, २०१९ रोजी दगडी शाळेजवळील गुप्ते इमारतीच्या पहिल्या मजल्याचा सज्जा कोसळला होता, दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी कोपरीतील लाल महल इमारतीचा काही भाग तसेच दिनांक २९ एप्रिल, २०१९ रोजी कोपरी गांधीनगरमधील के.एल. कॉलनीतील खन्ना हाऊस येथील घराचे छत कोसळे होते याबरोबरच कळवा, मुंब्रा, वागळे इस्टेट किसननगर परिसरातही अशा प्रकारच्या अनेक घटना घडलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार, कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ठाणे महानगरपालिकेने शासन परिपत्रक दिनांक ०५.११.२०१५ नुसार सन २०१९-२०२० करीता एकूण ४५०७ इमारती धोकादायक म्हणून घोषित केल्या आहेत. सदर इमारतींचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे:-

| **वर्गीकरण** | **इमारतीचे प्रकार** | **एकूण इमारती** |
|---|---|---|
| सी-१ | अतिधोकादायक व तात्काळ निष्कासीत करणे. | १०३ |
| सी-२ ए | रिकामी करुन संरचनात्मक दुरूस्ती करणे. | ९८ |
| सी-२ बी | रिकामी न करता संरचनात्मक दुरुस्ती करणे. | २२९७ |
| सी-३ | किरकोळ दुरुस्ती. | २००९ |
| | एकूण धोकादायक इमारती | ४५०७ |

(२) मुंब्रा प्रभाग समितीमधील असीफा इमारत तसेच नौपाडा-कोपरी प्रभाग समितीमधील गुप्ते इमारत यांचा काही भाग कोसळल्याने सदर इमारती खाली करून रहिवाशांना अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आले आहे.

नौपाडा-कोपरी प्रभाग समितीक्षेत्रातील लाल महल इमारतीस स्ट्रक्चरल ऑडीटनुसार राहिवास परवानगीसह दुरुस्तीस परवानगी देण्यात आली आहे.

गांधीनगर येथील तळ+१ इमारतीचा काही भाग कोसळल्याने सदर इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना ठाणे महानगरपालिकेने दिल्या आहेत.

(३) धोकादायक इमारतींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

• ठाणे महानगरपालिकेने सी-१ प्रवर्गातील एकूण १०३ इमारतींपैकी ८२ इमारती रिक्त करण्यात आल्या आहेत व या ८२ इमारतीपैकी ८ इमारती तोडण्यात आल्या आहेत. उर्वरीत २१ इमारतींची नळ संयोजने तोडण्यात आली असून, वीज संयोजने तोडणे संदर्भात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना कळविण्यात आले आहे.

• सी-२ ए प्रवर्गातील ९८ इमारतीपैकी २३ इमारती रिक्त करण्यात आलेल्या आहेत व या २३ इमारतींपैकी ०९ इमारती दुरूस्त झाल्या आहेत. उर्वरीत ७५ इमारती / सोसायटींना रहिवास खाली करण्याच्या नोटीसा ठाणे महानगरपालिकेने दिल्या आहेत.

• ठाणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नागरी पुनर्निर्माण समुह विकास योजनेची नियमावली दिनांक ०५.०७.२०१७ च्या अधिसूचनेन्वये समाविष्ट करण्यात आली असून, सदर योजनेमध्ये ३० वर्षापेक्षा जास्त जुन्या अधिकृत /अनधिकृत इमारतींचा समावेश आहे.

• नागरी पुनर्निर्माण समुह विकास योजने व्यतिरिक्त इतर इमारतींकरीता ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दिनांक ०५.०७.२०१८ च्या अधिसूचनेन्वये ३० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त आयुष्यमान झालेल्या अधिकृत धोकादायक इमारतींच्या पुनर्बांधणीसंदर्भात तरतुद लागू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगर जिल्हयामधील संरक्षण भिंतीच्या कामाबाबत

**(२) * १४१०५२ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर)** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातंर्गत, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने मुंबई शहर, मुंबई पूर्व व पश्चिम विभागातील डोंगर उतारावर झोपडपट्टया व चाळीवर पावसाळ्यात दरड कोसळून होणाऱ्या अपघातास

प्रतिबंध घालण्याकरिता संरक्षण भिंती बांधण्यासाठी माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निविदा काढली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांच्या मंजूरीनुसार लोकप्रतिनिधींच्या विकास निधीतून शासन परिपत्रकानुसार तिन्ही विभागाकरिता ३३.३३.३४ या प्रमाणानुसार जिल्हा उपनिबंधक यांच्या अखत्यारित येणाऱ्या मजूर सहकारी संस्थाकरीता काम देणे बंधनकारक असताना म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सर्व नियम डावलून एकाच कंत्राटदाराला ही कामे देऊन, ७५० मजूर सहकारी संस्था व बेरोजगार अभियंत्यांचा रोजगार हिरावून घेतल्याची बाब माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उपनगर जिल्ह्याकरिता एकाच कंत्राटदारांची नियुक्ती केल्यामुळे कामे वेळेत होणार नाहीत याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुंबई उपनगर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत निदर्शनास आणून दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापपर्यंत सदर कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली नसून मागील वर्षभर संरक्षण भिंतीचे काम सुरु न झाल्यामुळे उपनगर जिल्ह्यातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर संरक्षण भिंतीचे काम त्वरित सुरु होण्याबाबत तसेच मजूर सहकारी संस्था व बेरोजगार अभियंत्यांना काम नाकारणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील** : (१) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने दि.३१.०१.२०१९ रोजी संरक्षक भिंती बांधण्यासाठी ई-निविदा काढलेली आहे.

(२) हे खरे नाही. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ हे कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करते. शासन निर्णयानुसार मंडळामार्फत करण्यात येणाऱ्या कामांची विभागणी साधारणपणे ३३:३३:३४ यानुसार करण्यात येते. सन २०१८-१९ मध्ये झालेल्या एकुण कामांपैकी जिल्हा उपनिबंधक यांच्या अखत्यारीत येणाऱ्या मजूर संस्थांना शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रमाणानुसार कामे वाटप करण्यात आले आहे, असे मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने कळविले आहे.

संरक्षक भिंती बांधण्याच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर तांत्रिक मान्यता, प्रारुप ई-निविदा मंजूरी, निविदा प्रक्रिया प्रत्येक कामासाठी कंत्राटदार नेमण्यासाठी बराच कालावधी लागतो. परिणामी अतितातडीच्या स्वरुपात बांधावयाच्या संरक्षक भिंती बांधण्यासाठी बराच विलंब होतो. संरक्षक भिंती अतितातडीने बांधण्याकरिता ई-निविदेद्वारे एकच कंत्राटदार नेमण्याकरिता ई-निविदेची जाहिरात देण्यात आलेली होती, असे मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने कळविले आहे. सदर निविदा स्वीकृती करिता म्हाडा प्राधिकरणाची मान्यता घेण्यात आलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मागील वर्षी सदर निविदेत समाविष्ट नसलेली संरक्षक भिंतीची कामे सुरु करण्यात आलेले आहेत, असे मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने कळविले आहे.

मुंबई पूर्व जिल्हा उपनगरे मजूर सहकारी संस्था संघ मर्यादित यांनी सदर ई-निविदा प्रकरणी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र.४३९ दाखल केलेली आहे. मा.न्यायालयाने दि.१४.२.२०१९ रोजीच्या आदेशान्वये काम सुरु करण्याबाबत कार्यादेश देण्याकरिता स्थगिती आदेश दिलेले होते. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने कंत्राटदारास स्वीकृती पत्र तसेच कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नव्हते. तद्नंतर, मा. उच्च न्यायालयाने दि.०७.०६.२०१९ रोजी झालेल्या सुनावणीत उपरोक्त प्रकरणातील स्थगिती आदेश रद्दबातल केलेले आहेत. त्यास अनुसरुन न्यूनतम कंत्राटदारास स्वीकृती पत्र व कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया झोपडपट्टी सुधार मंडळाच्या स्तरावर सुरु आहे.

(५) व ६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोखाडा-त्र्यंबकेश्वर मार्गावरील (जि.पालघर) तोरंगणा घाटात खासगी बसला झालेला अपघात

**(३) * १३७६६४ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील मोखाडा-त्र्यंबकेश्वर मार्गावरील तोरंगणा घाटात दिनांक २४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास खासगी बस दरीत कोसळून ६ प्रवासी ठार झाले असून ७५ प्रवासी जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या अपघाताप्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच मृत्यूमूखी पडलेल्या प्रवाशांच्या कुटूंबियांना व जखमी प्रवाशांना मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील मोखाडा-त्र्यंबकेश्वर मार्गावरील तोरंगणा घाटात दि.२४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास खाजगी बस दरीत कोसळून झालेल्या अपघातात ४ प्रवासी ठार व २९ प्रवासी जखमी झालेले आहेत.
(२) सदर अपघात प्रकरणी मोखाडा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा रजि.न. २१/२०१९ भा.दं.वि.सं. कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८, सह मो.वा.का. कलम १८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आरोपी मयुर मनोज सिंगवाला, यास दि.२५/०३/२०१९ रोजी अटक करण्यात आले असून पोलिस विभागामार्फत पुढील तपास सुरू आहे.
(३) सदर दुर्घटनाग्रस्त गाडी गुजरात राज्यातील आहे, सदर दुर्घटना नैसर्गिक आपत्तीमध्ये येत नसल्याने महसूल व वन विभागाकडील दि.१३/०५/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अपघातातील मयत व्यक्तींच्या वारसांना मदत देण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सन १९७५ ते १९७७ या आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्यांचा प्रतिज्ञापत्र हाच पूरावा ग्राह्य धरण्याबाबत

**(४) * १३४९२३ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला),**

**श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९७५ ते १९७७ या दरम्यान आणीबाणीच्या काळात तुरुंगवास भोगलेल्यांकडे पूराव्यांची मागणी न करता १०० रुपयांच्या स्टँम्पपेपरवर संबंधीतांनी प्रतिज्ञापत्र दिले तरी तोच पूरावा ग्राहृय धरावा असा आदेश शासनाने दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ प्रतिज्ञापत्र हाच पूरावा धरला तर राज्यात अनेक व्यक्ती त्याचा गैरफायदा घेतील व त्यातून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार होण्याची शक्यता असल्यामुळे हा आदेश रद्द करावा, अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निघोज (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथे आंतरजातीय विवाह केल्याने पेट्रोल ओतून विवाहितेला जाळल्याबाबत

**(५) * १४११८५ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निघोज (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथे आंतरजातीय विवाह केल्याने श्रीमती रुक्मिणी व श्री.मंगेश रणसिंग यांना मुलीचे वडिल, श्री.रामा रामफल भरतिया, मामा, श्री.घनश्याम सरोजा व काका, श्री.सुरेंद्रकुमार भरतिया यांनी दिनांक १ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास घरात कोंडून रॉकेल ओतून पेटवून दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुलगी रुक्मीणी हिचा मृत्यू झाला व मुलगा मंगेश रणसिंग हा गंभीर जखमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस निरीक्षक श्री.बाजीराव पदेवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सुरु असलेला तपास पूर्ण झाला आहे काय, तपासात काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास श्री.विजयकुमार बोत्रे, पोलीस उप निरीक्षक, पारनेर पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर यांनी केलेला आहे. पुढील तपास श्री. मनीष कलवानिया, सहाय्यक पोलीस अधीक्षक, नगर ग्रामिण विभाग, अहमदनगर हे. दि.०७.०५.२०१९ रोजी पासून करीत आहेत.
(४) गुन्हयाचे तपासात अटक करण्यात आलेल्या आरोपी श्री.सुरेंद्रकुमार बाबुलाल भरतिया व श्री.घनश्याम मोहन सरोज यांचा गुन्हयाशी संबंध नसल्याचे दिसून आल्याने त्यांना सी.आर.पी.सी. कलम १६९ अन्वये गुन्हयातून मुक्त करणेबाबत मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पारनेर यांना दि.१०.०५.२०१९ रोजी अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्याचे तपासात गुन्ह्यातील फिर्यादी मंगेश चंद्रकांत रणसिंग हाच असल्याचे निष्पन्न झालेले आहे. सदर आरोपी हा ससून हॉस्पिटल, पुणे येथे ॲडमिट असून तो डिस्चार्ज होताच त्यास अटक करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत गुन्हा तपासावर आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## तारापुर औद्योगिक क्षेत्रातील (जि.पालघर) एस्क्वायर केमिकल आणि आरती ड्रग्ज या कंपन्यांमध्ये झालेली वायु गळती

**(६) * १३९८९० श्री.अमित घोडा (पालघर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील तारापुर औद्योगिक क्षेत्रातील एस्क्वायर केमिकल कंपनीमध्ये रासायनिक प्रक्रिया करतांना झालेल्या वायुगळतीमध्ये तीन कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असतांनाच तारापूरच्या आरती ड्रग्ज या कंपनीत दिनांक १४ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास वायुगळती झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरती ड्रग्ज कपंनीत झालेल्या वायुगळतीची बाधा चार महिला कर्मचा-यांना झाली असून त्यांना बोईसर येथील विकास रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वायुगळती घटनेमध्ये ३० कामगारांना गंभीर इजा झाली असतांना यासंदर्भातील अहवालात फक्त सात जणांना बाधा झाल्याचे नमुद करुन शासनाची दिशाभूल करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुरक्षेचे नियम डावलून उत्पादन घेणा-या तारापूर येथील औद्योगिक कंपन्यांची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार उक्त कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक १४/०५/२०१९ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास मे.आरती ड्रग्ज लिमिटेड, प्लॉट नं.ई-११९/१२०, या कारखान्यात बाहेरुन आणलेल्या अमोनिया सिलेंडरला छिद्र पडल्याने त्यातून अमोनिया वायुची गळती होऊन त्याची बाधा चार महिला कामगारांना झाली.

(२) होय, हे खरे आहे,

मे.आरती ड्रग्ज लिमिटेड, प्लॉट नं.ई-११९/१२० या कारखान्यात दिनांक १४/०५/२०१९ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास झालेल्या वायुगळतीची बाधा तेथे काम करणा-या ४ महिला कामगारांना झाली. त्यांना उपचारार्थ बोईसर येथील विकास रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना उपचारानंतर त्याच दिवशी सायंकाळी ६.०० वाजता घरी सोडण्यात आले.

(३) मे.स्क्वेअर केमिकल्स, प्लॉट नं.एन-६० या कारखान्यात दिनांक १२/०५/२०१९ रोजी दुपारी ३.२० वाजण्याच्या सुमारास झालेल्या वायुगळतीत तीन कामगारांचा मृत्यु झाला आणि दोन कामगारांना वायुची बाधा झाल्यावर त्यांना रुग्णालयात दाखल करुन उपचारानंतर दिनांक १३/०५/२०१९ रोजी घरी सोडण्यात आले.

तसेच मे.आरती ड्रग्ज लिमिटेड, प्लॉट नं.ई-११९/१२० या कारखान्यात दिनांक १४/०५/२०१९ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास झालेल्या वायुगळतीची बाधा ४ महिला कामगारांना झाल्यावर त्यांना रुग्णालयात दाखल करुन उपचारानंतर त्याच दिवशी सायंकाळी ६.०० वाजता घरी सोडण्यात आले.

(४) मागील एक वर्षात-पालघर जिल्हयात तारापूर औद्योगिक वसाहतीतील २८८ कारखान्यांचे निरिक्षण तसेच भेटी देऊन चौकशी करण्यात आली आहे. त्यामध्ये २७ कारखान्यांत आढळून आलेल्या त्रुटींकरीता ३० फौजदारी खटले न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

मे. स्क्वेअर केमिकल्स प्लॉट नं.एन-६० या कारखान्यात झालेल्या वायुगळतीची सखोल चौकशी दिनांक १२/०५/२०१९ व दिनांक १३/०५/२०१९ रोजी करण्यात आली असून चौकशीत आढळून आलेल्या कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ७-A(२) (a) व कारखाने नियम,१९६३ च्या नियम ४(२), ४(४), ४(१) (d) व ७३-एन (२) च्या भंगाकरीता कारखान्याचे

भोगवटादारा विरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात खटला क्रमांक ८३९९/२०१९ व ८४००/२०१९ हे ०२ फौजदारी खटले दाखल करण्यात आले. तसेच कारखाना बंद चे आदेश पारित करण्यात आले आहेत.

मे.आरती ड्रग्ज लिमिटेड, प्लॉट नं.ई-११९/१२० या कारखान्यात झालेल्या वायुगळतीची सखोल चौकशी दिनांक १४/०५/२०१९ रोजी करण्यात आली असून चौकशीत आढळून आलेल्या कारखाने नियम,१९६३ च्या नियम ४(२), ४(४) व ११५(१), ११५(२) च्या भंगाकरीता कारखान्याचे भोगवटादार व व्यवस्थापकांविरुध्द कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे.

तसेच मागील एक वर्षात ८२ कारखान्यांविरुध्द ९० फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच पालघर जिल्हयातील २०९ कारखान्यांविरुध्द २४२ फौजदारी खटले सध्या न्यायालयात चालू आहेत.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील वाशी येथील सेक्टर-१० एम मधील मिनी सीशोअर आणि सागर विहारला जोडणारा पादचारी पुल कोसळल्याबाबत

**(७) * १३८५९७ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील वाशी येथील सेक्टर-१० एम मधील मिनी सीशोअर आणि सागर विहारला जोडणारा पादचारी पुल कोसळल्या प्रकरणी नवी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी २ कनिष्ठ अभियंत्यांना निलंबित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाची दुरुस्ती करण्यासाठी माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान ठेकेदाराला वर्क ऑर्डर मिळल्यानंतरही ठेकेदाराने हा पुल रहदारीसाठी बंद केला नसल्याने पुल कोसळून झालेल्या अपघातास नवी मुंबई महानगरपालिकेच्या निलंबित दोन कनिष्ठ अभियंत्यांसह ठेकेदारावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर पुलाच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाशी येथील सेक्टर-८ मधील मिनी सीशोअर आणि सागर विहारला जोडणाऱ्या पादचारी पुलाचा काही भाग दि.११.०४.२०१९ रोजी पडला व त्यामुळे दोन व्यक्तींना दुखापत झाली.

• सदर प्रकरणी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांना दि.१८.०४.२०१९ रोजी निलंबित करण्यात आले होते.

• दि.०१.०६.२०१९ च्या आदेशान्वये त्यांचे निलंबन विभागीय चौकशी निर्णयाच्या अधीन संपुष्टात आणले आहे.

• सदर अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीबाबतची कार्यवाही सुरू असल्याचे नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सदर पुलाचे दुरूस्ती करणेकरीता दि.०८.०३.२०१९ अन्वये कामाचे कार्यादेश ठेकेदारास देण्यात आलेले आहेत.

• सदर घटनेबाबत वाशी पोलीस स्टेशनमध्ये गु. र. नं. १२४/२०१९ नुसार गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(३) सदर पुलाचे बांधकाम तपासून देण्यासाठी संचालक, आयआयटी, मुंबई यांना महानगरपालिकेने कळविले आहे.

• सदर पुल सध्या वापरासाठी बंद करण्यात आला असून तो निष्कासित करण्यात येणार असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बारामती तालुक्यातील (जि.पुणे) सक्षम ग्रुपने ५ हजार महिलांची केलेली फसवणूक

**(८) * १४१४५९ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती (जि.पुणे) तालुक्यातील सक्षम ग्रुपच्या श्रीमती मंदाराणी शिवाजी ढमढेरे व श्री.शिवाजी तुकाराम ढमढेरे यांनी बारामती तालुक्यातील जवळपास ५ हजार महिलांना फसविल्या प्रकरणी माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोणंद (जि.सातारा) येथील एका गुंतवणुकदाराने दिनांक २४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास फसविले गेल्याने विष प्राशन करुन आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बारामती तालुका पोलीसांनी ढमढेरे दांपत्याविरोधात आर्थिक फसवणुक व महाराष्ट्र ठेवीदारांच्या हित संबंधाचे संरक्षण अधिनियमाअंतर्गत (एमपीआयडी) गुन्हा दाखल करुन कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

श्री. अविनाश ज्ञानोबा जानकर व त्यांची पत्नी हे शिवजीत मुद्रा को-ऑप. सोसायटी व सक्षम ग्रुप यांचेकरीता एजंट म्हणून काम करीत होते. या दोन्ही संस्था बुडाल्याने लोकांनी त्यांच्याकडे रक्कम परत करण्याचा तगादा लावल्याने, रहिमतपूर येथील वडीलोपार्जित जमीनीचा वाद सुरु असल्याने तसेच मुलांच्या शिक्षणाच्या खर्चाच्या तणावामुळे अविनाश ज्ञानोबा जानकर यांनी विषारी औषध पिऊन आत्महत्या केली आहे. सदर प्रकरणी लोणंद पोलीस ठाणे जि. सातारा येथे आकस्मात मयत नंबर २१/२०१९ दाखल आहे. सदर अपमृत्युचा तपास पुर्ण झाला आहे.

(३) व (४) बारामती शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२९६/२०१९ भादंवि कलम ४२०, ४०६, ४६७, ४६८, ३४ सह एमपीआयडी ॲक्ट १९९९ चे कलम ३ अन्वये दाखल गुन्ह्यात ६ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ५ आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे. सध्या सदर अटक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्हा तपासावर आहे.

तसेच उक्त गुन्ह्यातील आरोपीवर प्राप्त तक्रारी नुसार बारामती पो. स्टे. येथे गु.र.नं.१३८/२०१९ भादंवि कलम ४२०, ४०६, ४६७, ४६८, ३४ सह एमपीआयडी ॲक्ट १९९९ चे कलम ३ अन्वये , फलटण शहर पो. स्टे. येथे १४२/२०१९ भादंवि कलम ४२०, ३४ प्रमाणे, खंडाळा पो. ठाणे येथे गु.र.नं.१८२/२०१८ भादंवि ४२०, ४०६, ४०९ प्रमाणे व लोणंद पो. ठाणे येथे गु.र.नं.७९/२०१९ भादंवि कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण कार्यालयांतर्गत येत असलेल्या कार्यक्षेत्रात जिओ कंपनीमार्फत सुरु असलेल्या बेकायदेशीर खोदकामाबाबत

**(९) * १३५३६२ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण कार्यालयांतर्गत येत असलेल्या कार्यक्षेत्रात जिओ कंपनीमार्फत केबल टाकण्यासाठी महानगरपालिकेकडे नाममात्र खोदकाम शुल्क भरून महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संगनमत करून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर खोदकाम सुरु असल्याचे माहे मे, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिओ कंपनीमार्फत या विभागात विना परवानगी उभारण्यात आलेल्या अनेक मोबाईल टॉवरमुळे स्थानिक नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून पाहणी करण्यात आली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे व त्यानूसार बेकायदेशीररित्या खोदकाम करणाऱ्या व मोबाईल टॉवर उभारणाऱ्या जिओ कंपनीविरुद्ध व त्यांना पाठीशी घालणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) रिलाईन्स जिओ इंन्फोकॉम प्रा. लि. कंपनीस केबल टाकण्याकरीता रु.३.५९ कोटी इतके शुल्क आकारुन ३८५८ मीटर लांबीचे खोदकाम करण्यास महानगरपालिकेच्या जी/दक्षिण विभागामार्फत परवानगी देण्यात आली आहे.

या परवानगी व्यतिरिक्त बेकायदेशीर खोदकाम सुरु नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मोबाईल टॉवरला परवानगी देतेवेळी इमारतीच्या तसेच मोबाईल टॉवरच्या संरचनात्मक स्थैर्यतेबाबत (Structural Stability) नोंदणीकृत अभियंता (Registered Structural Engineer) यांचेकडून स्थैर्यता प्रमाणपत्र घेण्यात येते.

महानगरपालिकेच्या जी/दक्षिण विभागामध्ये बेकायदेशीररित्या २ खाजगी इमारतींवर मोबाईल टॉवर उभारण्यात आले असल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले होते.

याबाबत २ खाजगी आस्थापनांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये नोटीस बजावून एका ठिकाणचे मोबाईल टॉवर काढून टाकण्यात आले आहे व दुसऱ्या ठिकाणी महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव (विशेष कक्ष) यांचेमार्फत नियमितीकरणाची परवानगी देण्यात आलेली आहे.

-----------------

## बुलढाणा नगरपरिषदेतंर्गत दलित वस्ती सुधार निधीचा अपहार झाल्याबाबत

**(१०) * १३५१८० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा नगरपरिषदेतंर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या दलित वस्ती सुधार निधीचा अपहार झाल्याबाबत स्थानिक नागरिकांनी दिनांक ०२ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, बुलढाणा यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने सदर अपहाराबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानूसार बुलढाणा नगरपरिषदेअंतर्गत दलित वस्ती सुधार निधीमध्ये अपहार करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) • श्री.प्रदीप मोरे व इतर स्थानिक नागरिक यांनी अशा आशयाचे एक निवेदन दिनांक २ मार्च, २०१९ रोजी सहायक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग, बुलडाणा यांना दिले होते. सदर निवेदनात प्राप्त झालेला निधी दलित वस्ती सोडून अन्यत्र खर्च होत असल्याची तक्रार करण्यात आली होती.
• सहायक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग, बुलडाणा यांनी सदर निवेदन जिल्हा प्रशासन अधिकारी, बुलडाणा व नगरपरिषद बुलडाणा यांना दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी कार्यवाहीस्तव पाठविले आहे.
• प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने नगरपरिषदेने त्रिसदस्यीय समिती गठीत केली असून त्याबाबत त्यांचे स्तरावर चौकशी करण्यात येत आहे.
• दरम्यान, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना चौकशी करुन शासनास १ महिन्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईत उभ्या राहिलेल्या ३५ इमारतींची सीसी आणि ओसी महानगरपालिकेने रद्द केल्याबाबत

**(११) * १३८२३८ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईत भूमाफियांनी बोगस दस्तऐवज सादर करुन सिडकोकडून बेकायदेशीररित्या घेतलेल्या भूखंडावर उभ्या राहिलेल्या ३५ इमारतींचे बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र (सीसी) आणि भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) महानगरपालिकेने रद्द केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीत अधिकृत घरे घेणारी शेकडो कुटुंबे रस्त्यावर येणार असून बोगस दस्तऐवज व सिडकोकडून बेकायदेशीररित्या भूखंड घेणाऱ्या भूमाफियांवर सिडको व्यवस्थापनाने आणि नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाने व नगररचना विभागाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर इमारतीत अधिकृत घरे घेणाऱ्या शेकडो कुटुंबियांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये सिडको महामंडळाच्या वाटप न केलेल्या भूखंडावर बोगस दस्ताऐवजाच्या आधारे बांधकाम परवानग्या घेण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने एकूण ८ प्रकरणांपैकी ७ प्रकरणामध्ये बांधकाम परवाने रद्द करण्यात आले आहेत. तर उर्वरित १ प्रकरण मा.न्यायालयात प्रलंबीत आहे.

तसेच भूखंड वाटपासाठी बोगस कागदपत्रे तयार करणाऱ्या ५ व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून उर्वरित २ व्यक्तीं विरुध्द गुन्हा दाखल करणेसाठी पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना सिडकोमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गंगाखेड (जि.परभणी) येथील “गंगाखेड शुगर ॲन्ड एनर्जी लि.” कारखान्याच्या संचालक मंडळाने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याबाबत

**(१२) * १३६५७१ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील**

**(कराड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड (जि.परभणी) येथील "गंगाखेड शुगर अॅन्ड एनर्जी लि." कारखान्याच्या संचालक मंडळाने जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांच्या नावावर पाच राष्ट्रीयकृत बँका व एका खासगी बँकेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन सुमारे ३२८ कोटी रुपयांचे कर्ज शेतकऱ्यांच्या नावावर घेतल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तक्रार प्राप्त झाली असून त्यानुषंगाने गंगाखेड पोलीस स्टेशन येथे दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार याप्रकरणी विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, "गंगाखेड शुगर अॅन्ड एनर्जी लि." कंपनीचे चेअरमन श्री.रत्नाकर गुट्टे यांनी २२ बनावट कंपन्या स्थापन करुन सुमारे २६ हजार शेतकरी व बँकांची सुमारे ३०० कोटी रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी विशेष तपास पथकाने दिनांक २६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास त्यांना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गंगाखेड शुगर अॅण्ड एनर्जी प्रा.लि. या कारखान्याच्या संचालक मंडळाने शेतकरी व ऊस तोड वाहतूकदार यांचे नावे कर्ज प्रकरणाची बनावट कागदपत्रे तयार करून बँकेत सादर करून विविध ७ बँकांकडून रू.५७८ कोटी ६८ लाख रूपयांचे कर्ज घेवून सदर कर्ज रक्कमेचा स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी वापर करून फसवणुक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) याप्रकरणी रत्नाकर गुट्टे सह ५ आरोपींना अटक करण्यात आली असून पाचही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

यापकरणी मा.न्यायालयात दि.२६/०३/२०१९ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ (८) प्रमाणे गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील बाचणी (ता.कागल) व बामणे (ता.भूदरगड) येथे पोलीसांनी जप्त केलेल्या २० लाख रुपयांच्या बनावट नोटांबाबत

**(१३) * १३७५३० श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील बाचणी (ता.कागल) व बामणे (ता.भूदरगड) येथे पोलीसांनी २० लाख रुपयांच्या बनावट नोटा दिनांक २१ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास जप्त केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नूसार संबंधीतांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चार आरोपींविरुध्द कागल पोलीस ठाणे कोल्हापूर येथे गु.र.क्र. ७७/२०१९ अंतर्गत भा.दं.वि.कलम ४८९ (अ) (ब) (क) (ड), ४२० व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## बदलापूर (जि.ठाणे) येथे बनावट विमा पॉलिसी देऊन आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(१४) * १३७९४२ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथे प्रतिष्ठित विमा कंपनीचे नाव सांगून बनावट पॉलिसी देऊन आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार माहे मे, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत बदलापूर (पूर्व) पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधीत दोषींना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर घटना १ मार्च, २०१९ ते १५ एप्रिल, २०१९ च्या दरम्यान घडलेली आहे.

(३) सदरहू प्रकरणी बदलापूर पूर्व पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५२/२०१९, भा.दं.वि. कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनमाड शहरासाठी (ता.नांदगांव, जि.नाशिक) कायमस्वरूपी शाश्वत पाणी पुरवठा योजना करंजवन धरण ते वाघदर्डी दरम्यान थेट पाईप लाईनद्वारे करण्याबाबत

**(१५) * १४१०२४ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील सुमारे एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या मनमाड शहरातील नागरिकांना मनमाड नगरपरिषदेमार्फत सद्यस्थितीत महिन्यातून एकदाच पाणी पुरवठा केला जात असल्यामुळे रहिवाशांना सातत्याने तीव्र पाणी टंचाईस सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनमाड पाणी पुरवठा पुनर्बांधणी योजनेंतर्गत मनमाड शहरासाठी कायमस्वरूपी शाश्वत पाणी पुरवठा योजना करंजवन धरण ते वाघदर्डी दरम्यान थेट पाईप लाईन टाकण्याच्या कामाचे सर्व्हेक्षण महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत करून २९७.७० कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला असून त्या विभागाने सदरच्या प्रस्तावास तत्वतः तांत्रिक मंजुरी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतची मागणी मुख्याधिकारी, मनमाड नगरपरिषद, मनमाड यांनी प्रधान सचिव, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेस प्रशासकीय मंजुरी देवून निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) • मनमाड शहराची लोकसंख्या ८५ हजार इतकी असून, सदर लोकसंख्येसाठी प्रतिमाणसी प्रतिदिन १३५ लिटर या शासनाच्या मानकानुसार तसेच तरती लोकसंख्या विचारात घेऊन सध्या ११.५५ एमएलडी पाण्याची गरज आहे.

• सध्या शहरास पालखेड डाव्या कालव्यामार्फत मिळणाऱ्या आवर्तनानुसार ४.५ एमएलडी पाणी पुरवठा सध्या करण्यात येत आहे.

• शहरास सध्या होणारा पाणीपुरवठा अपुरा असल्याने शहरातील पाणीपुरवठा हा ७ ते २२ दिवसांनी होत असल्याबाबतचा अहवाल मुख्याधिकारी, मनमाड नगर परिषद यांनी शासनास सादर केला आहे.

(२) • मनमाड शहर पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव नगरपरिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या तांत्रिक मान्यतेने नगरपरिषद संचालनालयामार्फत शासनास सादर करणे अपेक्षित आहे.

• मनमाड शहरासाठी शाश्वत पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने करंजवन धरणावरुन थेट पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सर्व्हेक्षण करुन रु.२९७.७७ कोटी किंमतीची योजना तयार केली आहे.

• तथापि, सदर योजनेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मान्यता दिली नाही.

(३), (४) व (५) • महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची अंतिम तांत्रिक मान्यता नसलेला प्रस्ताव मनमाड नगरपरिषदेने नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना दि.२७.०२.२०१९ च्या पत्रान्वये सादर केला होता.

• सदर प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करुन तांत्रिक मान्यतेसह प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी दि.०८.०४.२०१९ च्या पत्रान्वये मुख्याधिकारी, मनमाड नगरपरिषद यांना कळविले आहे.

• त्याअनुषंगाने योजना तांत्रिक व आर्थिकदृष्टया सक्षम होण्याच्या दृष्टीने विविध पर्यायांची तपासणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.

• महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाच्या स्थायी आदेशानुसार, योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेने नगरपरिषद प्रशासन संचालनालय मार्फत शासनाकडे आल्यानंतर सदर प्रकल्पाच्या मंजूरीबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

-----------------

## मरोळ (अंधेरी) मुंबई येथील ‘दि लीला’ या हॉटेलने केलेले अनधिकृत बांधकाम

**(१६) * १३५९२८ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरोळ (अंधेरी), मुंबई येथील ‘दि लीला (The Leela)’ हॉटेलने मुंबई महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय बेकायदेशीरपणे हॉटेलच्या अंतर्गत संरचना बदलून अनधिकृत बांधकाम केल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हॉटेलच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे केलेल्या बदलांची व बांधकामांची कागदपत्रे वारंवार विचारणा करूनही मिळाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त बांधकाम निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे एप्रिल, २०१९ मध्ये दि लीला या पंचतारांकित हॉटेलमध्ये अंतर्गत संरचना बदलून अनधिकृत बांधकाम केल्याची बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आली हे खरे आहे.
(२) दि लीला या हॉटेलच्या व्यवस्थापनाकडे बांधकामाच्या परवानगीची कागदपत्रे मागणी करुनही मिळाली नाहीत हे खरे आहे.
(३) व (४) सदर अनधिकृत बांधकामास बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये एकूण ६ नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

तथापि सदर प्रकरणी हॉटेल व्यवस्थापकांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक १५८१/२०१९ दाखल करण्यात आली होती.

सदर नोटीसांप्रकरणी सहाय्यक आयुक्त, के/पूर्व हे दिनांक २१.०६.२०१९ रोजी याचिकाकर्त्याला सुनावणी देत असल्याची बाब महानगरपालिकेने मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली असता, सदर सुनावणीमध्ये याचिकाकर्त्याच्या सर्व बाबी विचारात घेतल्या जाणार असल्याची खातरजमा झाल्यानंतर, मा.न्यायालयाने सदर रिट याचिका खारीज केली आहे. तथापि तोपर्यंत महानगरपालिकेने दिलेल्या नोटीसांची अंमलबजावणी करण्यास स्थगिती कायम आहे.

सदर प्रकरणी सुनावणी पुर्ण करुन तद्अनुषंगाने ६ आठवड्यांत कार्यवाही पूर्ण करुन अहवाल सादर करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

-----------------

## तलमोड (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथे पोलीसांच्या मारहाणीत एका वृध्द शेतकऱ्याचा झालेला मृत्यू

**(१७) * १३७०५५ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलमोड (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथे मद्यधुंद अवस्थेतील पोलीसाच्या मारहाणीत एका वृध्द शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेमुळे संतप्त ग्रामस्थांनी उमरगा पोलीस ठाण्याच्या परिसरात दिनांक २५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्या सुमारास ठिय्या आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार या घटनेला जबाबदार असणाऱ्या पोलीस अधिकारी व संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणाची चौकशी सहा.पोलीस अधीक्षक, उपविभाग तुळजापूर यांचेमार्फतीने करण्यात आली असून याप्रकरणी दाखल तक्रारीमध्ये काही तथ्य दिसून आलेले नाही. मयत शेतकरी यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यु झाल्याचे शव-विच्छेदन अहवालावरून निष्पन्न झाले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पवना धरणातून निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी आणण्यासाठीच्या थेट पाईपलाईन योजनेबाबत

**(१८) * १४१११५ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पवना धरणातून निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी आणण्यासाठीची थेट पाईपलाईन योजना सन २००७ मध्ये राबविण्याचा निर्णय घेतला असून सन २०११ मध्ये या योजनेच्या कामाला सुमारे रुपये ३३१.११ कोटी एवढी तरतूद महानगरपालिकेने केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने या संबंधित पाईपलाईनच्या कामाचे कार्यादेश दिनांक ३० एप्रिल, २००८ रोजी वा त्यासुमारास NCC-SMC-INDU (JV) या कंपनीला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाला सुरुवातही झाली मात्र पाइपलाईन योजनेला स्थानिक शेतक-यांचा विरोध असल्याने जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून गत ८ वर्षांपासून (म्हणजेच दिनांक १० ऑगस्ट, २०११) पवना धरणाची पाईपलाईन बंद स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानूसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियानांतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी पवना धरणातून निगडी येथील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत थेट पाईपलाईनने पाणी आणण्याची रु. २२३.३० कोटी किंमतीची योजना डिसेंबर, २००६ मध्ये मंजूर करण्यात आली होती.

• या योजनेसाठी सन २०११ च्या अर्थसंकल्पात रू.५५.११ कोटी एवढ्या रक्कमेची तरतूद पिंपरी-चिंचववड महानगरपालिकेने केली होती.

(२) • पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने या प्रकल्पाच्या कामाचे कार्यादेश ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-आयएनडीयू (जेव्ही) यांना दि.३०.०४.२००८ रोजी दिले आहेत.

(३) व (४) • सदर योजनेमध्ये पवना धरणातील शीर्ष कामे, पंपगृह, ब्रेक प्रेशर टँक, ६१० मीटरची उर्ध्ववाहीनी व ३४.८५ किमी लांबीच्या समांतर २ अशी ६९.७० किमी लांबीची गुरुत्ववाहीनी कामे प्रस्तावित आहेत.

• यापैकी, महानगरपालिका हद्दीतील ४.४०किमी लांबीच्या समांतर २ अशी एकूण ८.८० किमी लांबीची गुरुत्ववाहीनीची कामे पूर्ण झाली आहेत.

• दि.०९.०८.२०११ रोजी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बऊर येथे सदर प्रकल्पाविरोधात विविध संघटना व स्थानिक नागरीकांनी केलेल्या रास्ता रोको आंदोलनामुळे जिल्हादंडाधिकारी, पुणे यांनी जिल्हयाची कायदा व सुव्यवस्था परिस्थिती अबाधित ठेवण्यासाठी सदर योजनेचे काम स्थगित ठेवण्याबाबत दि.१०.०८.२०११ च्या पत्रान्वये कळविले होते.

• त्यानुसार दि.१०.०८.२०११ पासून सदर काम बंद आहे, ही वस्तुस्थिती आहे.

• सदर काम पुन्हा सुरु करण्याबाबत मा.पालकमंत्री, पुणे यांच्यामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी येथील (मुंबई) प्रादेशिक परिवहन विभागाच्या मालकीच्या भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पामध्ये झालेला गैरव्यवहार

**(१९) * १३५४२७ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी येथील (मुंबई) प्रादेशिक परिवहन विभागाच्या (आरटीओ) मालकीच्या भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी झोपू प्राधिकरणाने दिनांक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास घेतलेल्या निवडणूकीत झोपडपट्टीतील रहिवाशांची ७० टक्के संमती नसतांनाही शिवइन्फ्रा व्हिजन प्रा.लि. या कंपनीची विकासक म्हणून नियुक्ती करतांना गैरव्यवहार झाल्याचा आरोप प्रकल्पाचे माजी विकासक श्री.कृष्णा चमनकर यांनी केला असून मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे चौकशी करण्याची मागणी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे पत्र पाठवून या प्रकरणाचा अहवाल मागविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिला आहे काय,

(४) असल्यास, अहवालाच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करावयाच्या चौकशीबाबतची सद्यःस्थिती काय आहे व चौकशी पूर्ण झाली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने दोषी असणा-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे या प्रकरणी श्री. कृष्णा चमनकर यांचे निवेदन प्राप्त झाले असून त्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी झोपु प्राधिकरण यांचा अहवाल मागविला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या स्तरावर चौकशी सुरू आहे.

-----------------

## नवी मुंबईतील,घणसोली नोडमधील, सेक्टर ११ येथे विकासकाने अतिरिक्त चटई क्षेत्राचा गैरवापर करुन टॉवरचे बांधकाम केल्याबाबत

**(२०) * १३५९९९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील घणसोली नोडमधील सेक्टर ११, प्लॉट नं. ५ मधील जागेत विकासकाने, ४० टक्के अतिरिक्त चटई क्षेत्राचा गैरवापर करुन ३४ मजल्याच्या अलिशान अॅटलांटीस टॉवरचे अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत सदरहू टॉवरमधील घरे व दुकाने खरेदी करु नये असे नवी मुंबई महानगरपालिकेने आवाहन करुन स्थानिक पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अनधिकृत बांधकाम प्रकरणाची शासन तथा महानगरपालिकेने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानूसार सदरहू प्रकल्पात एकूण किती अतिरिक्त चटई क्षेत्राचा विकासकाने गैरवापर केल्याचे आढळून आले आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्पास सीसी व ओसी देणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगररचना खात्याच्या संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी आणि विकासकाविरुध्द पोलिसात दाखल केलेल्या तक्रारीनूसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) • नवी मुंबई क्षेत्रातील अ‍ॅटलांटीस टॉवर, सेक्टर-११, घणसोली येथील इमारतीस १.४९९ चटई क्षेत्र निर्देशानुसार सुधारीत परवानगी देण्यात आलेली आहे.

• सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर काही सदनिकाधारकांनी अंतर्गत फेरबदल केल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५३(१) अन्वये दि.१०.१०.२०१८ रोजी महानगरपालिकेमार्फत नोटीस देण्यात आलेली आहे.

• सदर नोटीशीची मुदत संपल्यानंतर दि.०३.१२.२०१८ रोजी रबाळे पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

• भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर सदर इमारतीतील एकूण १२ सदनिका व २ वाणिज्य दुकाने या ठिकाणची डबल टेरेस बंदिस्त केलेले अनधिकृत बांधकाम दि.२४.१२.२०१८, दि.२६.१२.२०१८ व दि.२७.१२.२०१८ रोजी पोलीस बंदोबस्तात निष्कासित करण्यात आलेले आहे.

• सदर ठिकाणी सदनिका/गाळे खरेदी न करण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेने दि.२८.११.२०१८ रोजी ‘दैनिक लोकमत’ या वृत्तपत्रात जाहीर आवाहन केले आहे.

• सदर इमारतीस दि.१५.०७.२०१७ रोजी नियमानुसार जोत्याचे तसेच भोगवटा प्रमाणपत्र दिल्याने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे पोलीस वसाहत व शहापूर पोलीस ठाण्याची इमारत बांधण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२१) * १३८६९२ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे २४२ घरांची पोलीस वसाहत व शहापूर पोलीस ठाणे इमारत बांधण्याचा प्रस्ताव माहे जानेवारी, २०१८ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या अस्तित्वात असलेल्या कर्मचारी वसाहतीची दुरवस्था झाली असल्याने सदर प्रस्ताव मंजूर होऊन नवीन वसाहतीचे बांधकाम सुरू होणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कर्मचारी वसाहत लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) पोलीस अधीक्षक, कोल्हापूर, यांच्या आस्थापनेवर, इचलकरंजी येथे २४२ पोलीस सेवा निवासस्थाने व पोलीस ठाणे इमारत यांचे बांधकाम करणेबाबतच्या प्रस्तावास म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांच्याकडून दिनांक २९.०२.२०१६ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच, उक्त प्रकल्पाचे नकाशे तयार करण्यात आले आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार उक्त प्रकल्प म.रा. पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांच्याकडून हाती घेण्यात येईल.

-----------------

## नाशिक येथील सिडको प्रशासनाने नागरिकांना ९९ वर्षाच्या कराराने दिलेली घरे फ्री होल्डसम (मालकी हक्क) करण्याबाबत

**(२२) * १३९४०० श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सिडको प्रशासनाने नागरिकांना ९९ वर्षाच्या कराराने दिलेली सुमारे २५,००० घरे फ्री होल्डसम (मालकी हक्क) करण्याचा महत्वपूर्ण निर्णय गत वर्षी शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शासनाच्या निर्णयाचा नाशिक शहरातील २५ हजार घरांचे मालक व पाच हजार भूखंडधारकांना लाभ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) सिडको मालकीच्या भाडेपट्टयाच्या जमिनी लिज होल्ड ते फ्रि होल्डसम करण्याबाबत शासनाच्या दि.२०.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच सिडकोच्या नविन शहरांच्या “नवी शहरे जमीन विल्हेवाट नियमावली, १९९२” मध्ये करावयाच्या सुधारणांना दि.०७.३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली आहे.

सदर निर्णयामुळे भाडेपट्टाधारकांना लाभ होणार असून उपरोक्त दि.२०.१२.२०१८ व दि.०७.०३.२०१९ रोजीच्या पत्रानुसार सिडको महामंडळाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## कुही (जि.नागपूर) नगरपंचायतीत एलईडी दिवे खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * १३७२८४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुही (जि.नागपूर) शहरामधील पथदिवे लावण्याकरिता ईईएससी या कंपनीचे एलईडी दिव्यांची मोठया प्रमाणात खरेदी करण्यात आली असून हे शहरातील पथदिव्यांमध्ये लावण्यात आले असता एका महिन्यातच १५० ते

२०० एलईडी लाईट बंद झाल्याने रहदारीच्या ठिकाणी अंधाराचे साम्राज्य पसरलेले असल्याचे दिनांक ७ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एलईडी दिव्यांची नियमबाहय खरेदी करण्यात आली आहे तसेच संबंधित पुरवठा दाराकडून हलक्या दर्जाच्या एलईडीचा पुरवठा करण्यात आला असून यात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानूसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाचे वृत्त “दैनिक देशोन्नती” या स्थानिक वृत्तपत्राच्या दिनांक ७ मे, २०१९ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे.

(२) व (३) • राज्य शासनाच्या ऊर्जा संवर्धन धोरण-२०१७ नुसार सर्व नागरी स्वराज्य संस्थांना पथदिवे बसवितांना फक्त एलईडी पथदिवे बसविणे बंधनकारक केले आहे.

• या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रम असलेल्या एनर्जी एफिशिएन्सी सर्विसेस लिमिटेड म्हणजेच ईईएसएल (EESL) च्या माध्यमातून एस्को तत्वावर एलईडी (LED) पथदिवे बसविणे व त्यानुसार ईईएसएल (EESL) सोबत करारनामा करणे नागरी स्वराज्य संस्थांना बंधनकारक करण्यात आले आहे.

• कुही नगरपंचायतीने याच धोरणाच्या अनुषंगाने ईईएसएल (EESL) सोबत करारनामा केला आहे. त्यानुसार ७७५ एलईडी (LED) पथदिवे ईईएसएल (EESL) ने नगरपरिषद हद्दीत बसवून द्यावयाचे आहेत. तसेच ७ वर्षात सदर पथदिवे बंद पडल्यास ते बदलून द्यावयाचे आहेत.

• आजमितीपर्यंत ६१३ पथदिवे ईईएसएल (EESL) ने बसविले असून उर्वरित पथदिवे बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. बसविण्यात आलेले पथदिवे बंद पडल्यास ते ईईएसएल (EESL) कडून बदलूनही दिले जात आहेत.

• सदर पथदिवे योग्य त्या दर्जाचे असल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.

• नगरपंचायतीस या एलईडी (LED) दिवे खरेदीसाठी कोणतीही रक्कम आजरोजी प्रदान करावयाची नसून सर्व एलईडी (LED) दिवे लावून झाल्यानंतर वीजबिलात जी बचत होईल त्या बचतीमधील रक्कमेचा काही भाग ईईएसएल (EESL) ला द्यावयाचा आहे.

• याप्रकरणी कोणताही गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ९१ मच्छीमार बंदरांच्या सुरक्षिततेबाबत

**(२४) * १३६९५५ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजमल कसाब आणि त्याच्या साथीदारांनी दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजी समुद्रामार्गे येवून मुंबईवर केलेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून नौदलाने केलेल्या सर्व्हेक्षणात राज्यातील सागरी किनाऱ्यावरील ५२५ मासेमारी बंदरांपैकी मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या ५ जिल्ह्यातील ९१ बंदरे अतिसंवेदनशील आढळली असून याबाबत नौदल प्रमुखांनी सुरक्षा व्यवस्था ठेवण्याबाबत शासनाला स्पष्टपणे कळविलेले असतानाही अद्यापपर्यंत शासनाकडून या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या हल्ल्यानंतर संभाव्य धोके टाळण्यासाठी गुजरात आणि तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर या बंदरावर येणाऱ्या मासेमारी नौकांसह खलाशांची नोंद ठेवण्यासाठी नौदल आणि गृह विभागाच्या निर्देशानुसार महाराष्ट्राच्या मत्स्य व्यवसाय विकास विभागाने जुलै १ ऑगस्ट २०१५ मध्ये टोकन पद्धत राबवून ३ पाळयांत सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी २७९ सुरक्षा रक्षकांसह २३ पर्यवेक्षक असे ३०२ सुरक्षा कर्मचारी येथे ठरविले होते, मात्र त्याचे पालन न झाल्याने तुरळक अपवाद वगळता सध्याही या बंदरांची सुरक्षा वाऱ्यावरच असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यातील सदरहू ९१ बंदरे अतिसंवेदनशील असल्याने सदरहू बंदरांवर विनाविलंब कायमस्वरूपी सुरक्षाव्यवस्था करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सागरी सुरक्षा मंडळामार्फत कंत्राटी पध्दतीने २७३ सुरक्षा रक्षक व २३ पर्यवेक्षक यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) कृषि व पदुम विभाग,शासन निर्णय क्र.मत्स्यवि/१११४/प्र.क्र.११४/पदुम-१४ दि.३०/०६/२०१५ अन्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेचे कचऱ्यापासून वीजनिर्मितीचे प्रकल्प बंद असल्याबाबत

**(२५) * १४१४०४ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात कचऱ्यावर प्रक्रिया करून वीज निर्मिती करण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी २५ वीज निर्मिती प्रकल्प उभारले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांसाठी एकूण १९ कोटी रुपये खर्च करण्यात येऊन बहुंताश प्रकल्प बंद अवस्थेत असल्याची माहिती माहितीच्या अधिकाराद्वारे निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कचरा प्रकल्पांपैकी हडपसर मधील दोन, पेशवे पार्क जवळ दोन आणि कात्रज रेल्वे म्यूझियम जवळ एक वीज निर्मिती प्रकल्प दिनांक १ जुलै, २०१८ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास

पूर्णत: बंद होते तसेच वडगाव येथील दोन व घोले रस्ता वानवडी येथील प्रकल्पात युनिट वीज निर्मिती झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पातून एक टन कचऱ्याचेही विघटन न होता तेथे गॅस आणि वीज निर्मिती होऊ शकली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, दरमहा तीन लाख साठ हजार युनिट वीज निर्मिती होणे अपेक्षित असताना केवळ १६ टक्के वीज निर्मिती झाल्याचे सजग नागरिक मंचाच्या वतीने मिळविलेल्या माहितीतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, कचऱ्यापासून वीज निर्मिती बहुतांशी प्रकल्प बंद असल्याने महानगरपालिकेच्या कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून कचऱ्यापासून वीज निर्मितीच्या सदर २५ प्रकल्पांची सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी करून विज प्रकल्पांवर कारवाई करण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(७) असल्यास, पुणे शहरातील कचऱ्याचे ऑडिट करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) पुणे शहरात कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता विविध ठिकाणी २५ बायोगॅस प्रकल्प उभारण्यात आले आहेत. त्यापैकी सद्य:स्थितीत २१ प्रकल्प कार्यान्वित आहेत. तसेच ४ प्रकल्प तांत्रिक कारणांमुळे बंद आहेत.

• सदर प्रकल्प उभारण्याकरीता रु.१७.८३ कोटी इतका खर्च झालेला आहे.

• बंद ४ प्रकल्पांपैकी फेरनिविदा काढण्याकरीता तसेच आवश्यक दुरुस्त्या करण्याकरीता २ प्रकल्प बंद होते.

• हडपसर येथील २ प्रकल्प पुणे छावणीच्या कचरा डेपोशेजारी असल्याने प्रकल्पाची दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे सदर प्रकल्प सध्या बंद आहेत.

• या प्रकल्पांबाबत सजग नागरी मंच या संस्थेने केलेल्या मागणीस अनुसरुन दि.१८.०३.२०१९ रोजी सदर संस्थेस या प्रकल्पांच्या सद्य:स्थितीबाबत माहिती देण्यात आली आहे.

• हडपसरमधील २, पेशवे पार्कजवळील २ आणि कात्रज रेल्वे म्युझियम येथील १ वीज निर्मिती प्रकल्प दि.०१.०७.२०१८ पासून बंद होते, हे खरे आहे.

• तथापि, कात्रज रेल्वे म्युझियम येथील १ प्रकल्प दि.०१.०३.२०१९ पासून कार्यरत झालेला आहे.

• वडगाव येथील २ प्रकल्प, घोले रोड येथील १ प्रकल्प व वानवडी येथील १ प्रकल्प सध्या कार्यान्वित आहेत. या प्रकल्पातून निर्माण होणारा गॅस पुणे महानगरपालिकेच्या अंतर्गत बाबींसाठी वापरला जात होता. सद्य:स्थितीत गॅस निर्मिती सुरु आहे. तथापि, तांत्रिक कारणामुळे वीज निर्मिती बंद आहे.

(५) पुणे शहरातील एकूण २५ बायोगॅस प्रकल्पातून दरमहा २,६५,६८० युनिट वीजनिर्मिती होणे अपेक्षित होते. तथापि, ४ प्रकल्प तांत्रिक कारणास्तव बंद असल्याने तसेच ४ प्रकल्पातून वीज निर्मिती होऊ न शकल्याने केवळ २२.५८ टक्के एवढी वीज निर्मिती झालेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(६) व (७) • पुणे महानगरपालिकेच्या प्रक्रिया प्रकल्पांपासून कचरा जिरवणे हे मुख्य उद्दिष्ट असून निर्माण होणारी वीज सदर प्रकल्पातील उपकरणे चालविण्यासाठी वापरली जाते.

• विकेंद्रीत पध्दतीने कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या प्रकल्पांचे तांत्रिक विश्लेषण/लेखा परीक्षण करण्याकरीता राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी व अनुसंधान संस्था (NEERI) या शासकीय संस्थेची नेमणूक करण्यात आली होती.

• सदर संस्थेचा अंतिम अहवाल दि.३१.०३.२०१९ रोजी प्राप्त झाला असून सदर संस्थेने प्रकल्पांतील तांत्रिक बाबी, निविदा प्रक्रिया, बायोगॅस स्लरी (गाळ) याबाबत उपाययोजना सुचविल्या आहेत.

• त्यानुसार अंमलबजावणीचे काम चालू आहे असे, पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गाडीबोरी (जि.यवतमाळ) येथील एका तरुणाचा पोलीसांच्या मारहाणीत झालेला मृत्यू

**(२६) * १३७०४३ श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील गाडीबोरी येथील श्री. संजय विठ्ठल बुरकुले या तरुणाचा पोलीसांनी केलेल्या मारहाणीत दिनांक ४ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यांसदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार संबंधीत पोलीसांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

दिनांक ४/०३/२०१९ रोजी पोलीस स्टेशन दराटी येथील बिट प्रभारी पोलीस नाईक हे एक पोलीस कर्मचारी व दोन गृह रक्षक दलाच्या जवानासह जुगार रेड कामी मौजा बोरी शिवारात गेले असता पोलीसांना पाहून जुगार खेळणारे लोक पळू लागले. त्यावेळी संजय विठ्ठल बुरकुले हा पैनगंगा नदी पात्राकडून बोरी गावाकडे येत असता शेतात नांगरलेल्या ढेकळात खाली पडला. पोलीसांनी लोकांचे मदतीने त्यास उपचाराकरीता किनवट येथील

शासकीय रुग्णालयात नेले असता त्याचा मृत्यू झाला असून मृतकाचे शवविच्छेदन करण्यात आले. मृत्यूच्या कारणाबाबतचा अहवाल वैद्यकीय अधिकारी यांनी व्हीसेरा अहवाल येईपर्यंत राखून ठेवला आहे. सदर आकस्मात मृत्यूच्या तपासात पोलीसांनी मारहाण केल्यामुळे मृत्यू झाल्याचे आढळून आले नाही. मृत्यू प्रकरणी पो.स्टे. दराटी, जि.यवतमाळ येथे आकस्मात मृत्यू क्र.३/१९ फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७४ प्रमाणे प्रकरण नोंद असून त्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चेंबूर परिसरात (मुंबई) भूखंड विकसित करण्यासाठी व्यावसायिकाला दिलेल्या रकमेचा अपहार केल्याबाबत

**(२७) * १३९६८५ श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर परिसरात भूखंड विकसित करण्यासाठी दिलेल्या सुमारे दीड कोटी रुपयांचा अपहार करून फसवणूक झाल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी एका व्यावसायिकाविरुद्ध चेंबूर पोलीसांनी अपहार आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी चेंबुर पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. १२१/२०१९ भा.दं.वि. कलम ४०६, ४२० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरहू गुन्ह्यात एका आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील ताडी माडी केंद्रामध्ये विषारी ताडी माडीची विक्री होत असल्याबाबत

**(२८) * १३४९७३ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सुमारे २५० सरकारमान्य केंद्रामध्ये विषारी ताडी माडीची विक्री होत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे कॉलनीतील एका तबेल्यामध्ये छापा टाकून पोलीसांनी २००० किलो विषारी क्लोराईड हायड्रट पावडरसह भेसळयुक्त ताडी माडी जप्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून विषारी ताडी माडीची विक्री करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात माहे मे, २०१९ या कालावधीत सरकारमान्य ताडी माडी विक्री केंद्रामध्ये रासायनिक पदार्थ भेसळयुक्त ताडी माडी विक्री होत असल्याबाबत २ गुन्हे दाखल आहेत.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी आरे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७८/२०१९ भा.दं.वि. कलम ३२८, २७२, २७३, ३४ सह कलम ६५ (ई), ७८ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, सह कलम ६(१) (अ) विषारी पदार्थ अधिनियम, १९१९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयात ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

तसेच, विलेपार्ले पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ११६/२०१९ भा.दं.वि. कलम २७२, ४२०, ३४ सह कलम ६५ (ब) (ड) (फ), मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयात २ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

उपरोक्त दोन्ही गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती येथील शासनाच्या आदिवासी विभागाच्या अखत्यारितील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या उपसंचालकांनी पदाचा केलेला गैरवापर

**(२९) * १४१९३७ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या आदिवासी विभागाच्या अखत्यारितील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या अमरावती येथील उपसंचालक श्रीमती प्रीती बोंद्रे या गत १२ वर्षांपासून संशोधन अधिकारी, वरिष्ठ संशोधन अधिकारी व आता उपसंचालक या पदावर कार्यरत असतांना त्यांनी व या विभागातील अन्य कर्मचा-यांनी पदाचा गैरवापर करुन अपसंपदा जमविल्याप्रकरणी चौकशी करुन संबधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची मागणी स्थानिक खासदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधिक्षकांकडे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीनुसार पुढे संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

याप्रकरणी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी गोपनीय पडताळणी करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांना दिले असून प्रकरणाची गोपनीय पडताळणी सुरू आहे.

-----------------

## निफाड साखर कारखान्याच्या निफाड तालुक्यातील (जि.नाशिक) अतिरिक्त जागेवर साकारण्यात येणारा "ड्रायपोर्ट" प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(३०) * १३६१७७ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड तालुक्यातील (जि.नाशिक) निफाड साखर कारखान्याच्या अतिरिक्त जागेवर साकारण्यात येणाऱ्या बहुचर्चित ड्रायपोर्ट प्रकल्पाला मा.केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग नौवहन व मा.मुख्यमंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये ५०० कोटी रुपये गुंतवणुकीसह मान्यता देऊनही अद्याप हा प्रकल्प प्रलंबीत असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामुळे निफाड तालुक्यातील शेतीमालाच्या निर्यातीला चालना मिळणार असून तालुक्यात रोजगाराच्या सुविधाही वाढणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा प्रकल्प अद्याप प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने प्रकल्प पुर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) निफाड साखर कारखान्याच्या अतिरिक्त जागेवर साकारण्यात येणाऱ्या ड्रायपोर्ट प्रकल्प प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) नाशिक येथे ड्रायपोर्ट उभारणेबाबत जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट व महाराष्ट्र शासन यांच्या दरम्यान सन २०१८ मध्ये सामंजस्य कराराच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास एजन्सी म्हणून नामनिर्देशित करण्यात आले

आहे. त्याअनुषंगाने नाशिक येथे ड्रायपोर्ट उभारणीच्या संदर्भात सहमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन सदर बैठकीमध्ये जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट यांच्यामार्फत प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच उक्त क्षेत्राचा Pre Feasibility Assessment करण्यात आले असून प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट यांच्याकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे ग्रीन ॲपल कार्पोरेशन या कंपनीने नागरीकांची केलेली फसवणूक

**(३१) * १३९२४९ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे ग्रीन ॲपल कार्पोरेशन नावाची कंपनी स्थापन करुन दामदुप्पट रक्कमेचे आमिष दाखवुन नागरीकांची लाखो रुपयांची फसवणुक केल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात अशा प्रकारे नागरीकांना दामदुप्पट रक्कमेचे अमिष दाखवुन यापुर्वी देखील मुंबईत या कंपनीच्या व्यवस्थापकाने नागरीकांची फसवणुक केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, नाशिक शहर आणि पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण तसेच बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील

कोणत्याही पोलीस ठाण्यात ग्रीन ॲपल कार्पोरेशन या कंपनीविरुद्ध दामदुप्पट रक्कमेचे आमिष दाखवून नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याबाबत कोणतीही तक्रार वा गुन्हा दाखल नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई उपनगरीय रेल्वे हद्दीत सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(३२) * १३६०३४ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरीय रेल्वे हद्दीत दिनांक १ जानेवारी, २०१३ ते माहे डिसेंबर, २०१८ पर्यंत एकूण २,०८४ साखळी चोरीच्या गुन्हयांची नोंद झाली असून त्याची एकूण किंमत ८ कोटी २८ लाख २४ हजार ३९९ रुपये असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी फक्त ३ कोटी ३२ लाख ३९ हजार ९२१ रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलीसांना यश आले असून हे प्रमाण ४० टक्के इतकेच आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सोनसाखळी चोरीचे गुन्हे रोखण्यात आलेल्या अपयशाची कारणे काय आहेत व सोनसाखळी चोरीचे गुन्हे रोखण्याबाबत व रेल्वेमधून प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

नमूद गुन्ह्यांमध्ये एकूण रु. ८,५६,०७,४६३/- किंमतीचा मुद्देमाल चोरीस गेला असून त्यापैकी रु. २,६७,८३,६१९/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

(३) गुन्ह्यांना रोखण्यासाठी व रेल्वेमधून प्रवास करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेसाठी सर्व रेल्वे स्थानकांवर फलाट गस्त पथक व गुन्हे प्रतिबंध आणि सुरक्षा पथक दिवसा व रात्रौ नियुक्त करण्यात येतात.

महिला पोलीसांचे स्वतंत्र "निर्भया पथक", कडून मध्य व पश्चिम परिमंडळात गस्त नेमण्यात येते व त्याव्दारे महिलांसंदर्भातील गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यात येतो. रात्रीच्या प्रत्येक लोकल ट्रेनमध्ये रात्रौ ९.०० ते सकाळी ६.०० वा. पर्यंत महिलांसाठी राखीव असलेल्या डब्यात रेल्वे पोलीसांकडून रेल्वे पोलीस, होमगार्डस व महाराष्ट्र सुरक्षा बल यांचे संरक्षण पुरवले जाते. रेल्वे स्थानांकावरील गुन्हे रोखण्यासाठी व गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी सुमारे २७१ सीसीटीव्ही व ४०८१ कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. रेल्वे पोलीसांव्दारे १५१२ ही रेल्वे पोलीस हेल्पलाईन चालू करण्यात आली असून त्याव्दारे प्रवाशांच्या तक्रारी, गुन्हे, गुन्हेगार/संशयिता संदर्भात माहिती प्राप्त करुन त्यांना वेळेवर मदत पुरवणे अथवा त्यावर तात्काळ दखल घेऊन त्याच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येते. रेल्वे कार्यक्षेत्रात आढळून येणारे संशयित, सराईत व वारंवार गुन्हे करणारे इसम यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात येवून आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी, त्यांना जरब बसावी या करीता कायद्यातील तरतूदींचा जास्तीत जास्त वापर करत प्रतिबंधक कारवाई करण्यात येते. नशा करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याकरिता वेळोवेळी विशेष मोहिम राबविण्यात येतात. रेल्वे प्रवासादरम्यान प्रवाशांनी त्यांच्या मौल्यवान वस्तु व सामानाप्रती जागरुक रहावे, याकरिता नियमितपणे उद्घोषणा करुन प्रवाशांना सतर्क करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) शहरातील चोरीच्या घटनांबाबत

**(३३) * १४००८५ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) शहरातील सरगम चौकातील हॉटेल विरंगुळा बिअर बार परमिट रूमचा दरवाजा तोडून चोरट्यांनी सुमारे १ लाख ७० हजार ९१० रूपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना दिनांक २३ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त घटनेप्रमाणे पंढरपूर शहरात व परिसरात चोरींच्या घटनांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील दोन राष्ट्रीयकृत बँकांमधून भरदिवसा चोरी झाल्याच्या घटनाही घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर घटनांच्या तपासामध्ये स्थानिक पोलीस प्रशासनाला अद्यापही यश आले नसल्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये भितीचे व संतापाचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शहरातील चोरी-दरोडे तपासात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच शहरातील चोरी-दरोडे रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

यात्प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरून पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ७४२/१९ भा.दं.वि.स. कलम ४५७, ३८० प्रमाणे अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल असून गुन्हा तपासावर आहेत.

(२) पंढरपूर शहर परिसरात चोरीच्या सदराखाली दाखल गुन्हयांची माहीती पुढीलप्रमाणे आहे.

| कालावधी | दाखल | उघड |
|---|---|---|
| माहे जानेवारी ते मे २०१६ अखेर | १९ | ०२ |

| | | |
|---|---|---|
| माहे जानेवारी ते मे २०१७ अखेर | १८ | ०६ |
| माहे जानेवारी ते मे २०१८ अखेर | २१ | ०७ |
| माहे जानेवारी ते मे २०१९ अखेर | ६४ | १२ |

(३) व (४) बँक ऑफ बडोदा शाखा, पंढरपूर येथे फिर्यादी यांची नजर चुकवून रू.४०,०००/- ची रक्कम चोरून नेल्याप्रकरणी गु.र.नं. ६७८/१९ भा.दं.वि.स. कलम ३७९, ३४ प्रमाणे ७ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस अटक करून त्याच्याकडून रू.१३,०००/- हस्तगत करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे. तसेच स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा, पंढरपूर येथून रू.९,२५,५४३/- ची रक्कम चोरून नेल्याप्रकरणी प्राप्त फिर्यादीवरून गु.र.नं. ६६३/१९ भा.दं.वि.स. कलम ३८०, ३४ प्रमाणे ११ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस अटक करण्यात आले आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे. दोन्ही गुन्हयात सहभागी असणाऱ्या एका आरोपीस अटक करून त्याचेकडून काही रक्कम हस्तगत करण्यात आलेली असून गुन्हयांचा तपास चालू आहे. शहरातील नागरिकांमध्ये भितीचे व संतापाचे वातावरण पसरलेले नाही.

(५) पंढरपूर शहरात दिवसपाळी व रात्रपाळी करिता १ अधिकारी व २० कर्मचारी यांची नेमणूक करून नाकाबंदी, चेकिंग, रात्रगस्त पेट्रोलिंग करण्यात येत आहे. मिळून आलेल्या संशयितांवर वेळीच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०९ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेने स्वच्छ सर्व्हेक्षणासाठी नेमलेल्या मे. ई अॅण्ड वाय कंपनीची नियुक्ती नियमबाहय करण्यात आल्याबाबत

**(३४) * १३५५३३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने स्वच्छ सर्व्हेक्षणासाठी नेमलेल्या मे. ई ॲण्ड वाय कंपनीची नियुक्ती नियमबाह्य करण्यात आल्याची बाब माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्व्हेक्षण स्पर्धेत पुणे शहर देशपातळीवर अव्वल ठरण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून मे. ई ॲण्ड वाय कंपनीची नेमणूक शेवटच्या तीन महिन्यात नियबाह्यरीत्या करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली असून या कंपनीकडून सल्ला घेण्यासाठी महानगरपालिकेने ३५ लाख रुपये अदा केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वच्छ सर्व्हेक्षणाच्या आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणे, स्वच्छतेविषयक विविध उपाययोजना प्रस्तावित करणे, सादरीकरण करणे या कामांमध्ये मे. ई ॲण्ड वाय व केपीएमजी कंपनीने शासनाची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

• पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागास सहाय्य करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून मे. ई ॲण्ड वाय या कंपनीची दिनांक २६.१२.२०१७ च्या आदेशान्वये प्रथमत: एक वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर, त्या कंपनीस जून २०१९ अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

• स्वच्छ सर्वेक्षण-२०१९ च्या कामांसाठी मे. के.पी.एम.जी. ॲडव्हायजरी सर्विसेस प्रा.लि. यांची तीन महिन्याच्या कालावधीकरिता रू ३५,३०,४०० या रकमेवर नियुक्ती करण्यात आली होती.

(३) हे खरे नाही.

• पुणे महानगरपालिकेने शहरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी व स्वच्छ सर्वेक्षण- २०१९ करीता नेमलेल्या संस्थांनी त्यांना नेमून दिलेली कामे पार पाडली आहेत. त्यामुळे आर्थिक फसवणूकीचा प्रश्न उद्भवत नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## पालघर (पूर्व) येथील औद्योगिक वसाहतीतील नॅशनल फर्निचर कंपनीस लागलेली आग

**(३५) * १४०२६६ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (पूर्व) येथील गणेशनगर औद्योगिक वसाहतीमधील नॅशनल फर्निचर या कंपनीला दिनांक २४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास आग लागून मोठ्या प्रमाणात कंपनीचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीत असलेल्या केमिकल ट्रँकरमुळे सदरहू आग मोठ्या प्रमाणात पसरली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार दोषी असणाऱ्या संबंधीतांविरुद्ध कारवाई करुन सदर कंपनीला नुकसान भरपाई मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे :** (१) होय, हे खरे आहे.

मे. नॅशनल फर्निचर वर्क्स, प्लॉट नं. १०, सर्व्हे नं. ४७/२, वेवूर गांव, पालघर(पूर्व), ता. पालघर, जि. पालघर येथील या कारखान्याला दिनांक २४.०३.२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता आग लागून कारखान्याचे नुकसान झाले आहे.

(२) सदर कारखान्याच्या कंपाऊंड बाहेर असलेल्या गवताला आग लागली होती. ती आग कंपाऊंडमधील सॉलव्हंट ड्रमला लागून कारखान्यात पसरली. तेथे उभा असणा-या फरनेस ऑईलचा टँकर नं. GT-०३AT २६४१ हा सदर आगीत जळाला. कारखान्यातील सॉलव्हंट ड्रम व फरनेस ऑईलमुळे ही आग मोठ्या प्रमाणात परसली.

(३) सदर प्रकरणी दिनांक २४.०३.२०१९ रोजी चौकशी करण्यात आली असून त्या चौकशीमध्ये भोगवटादाराने कारखान्यातील काही भाग हा भाडयापोटी ज्वालाग्रही रसायनाचे ट्रेडींग करणा-या जकारीया एंटरप्राइजेसला भाडयाने दिलेला होता. कारखान्याचा काही भाग भाडयाने दिल्यामुळे कारखान्याची इमारत ही मंजूर नकाशाप्रमाणे नसल्यामुळे भोगवटादाराविरुध्द नियम ४(२) महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ च्या भंगा करीता न्यायालयात खटला दाखल केला आहे. सदर कारखान्याच्या नुकसान भरपाई करीताची कार्यवाही शासनाच्या कार्यकक्षेत येत नसून त्याकरीता कारखाने व्यवस्थापनाने मालमत्तेचा विमा घेणे आवश्यक असते. सदर कारखाना व्यवस्थापनाने मालमत्तेचा विमा घेतलेला नव्हता.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली नगरपरिषदेमध्ये विविध योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३६) * १३९३१८ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली नगरपरिषदेमध्ये दिनांक १ एप्रिल, २०१० ते माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान २१ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा अहवाल महालेखाकार, नागपूर यांनी शासनाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालामध्ये सदर गैरव्यवहार सुवर्णजयंती नगरोत्थान योजना, वैशिष्टपूर्ण योजना, वृक्ष लागवड, अनुसूचीत जाती, नवबौद्ध घरकुल योजना, पाणीपुरवठा योजना इत्यादी योजनांमध्ये झाल्याची बाब नमूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार २१ कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महालेखापाल, नागपूर कार्यालयाने नगरपरिषद, गडचिरोली कार्यालयाचे दिनांक २४/८/२०१५ ते दिनांक ५/९/२०१५ या कालावधीत सन २०१० ते सन २०१५ या ५ वर्षाच्या कालावधीचे लेखापरिक्षण केले. त्यामध्ये एकूण १५ आक्षेप नोंदविले असून ते दिनांक १/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये महालेखापाल कार्यालयाने नगरपरिषदेस कळविले होते.

(२) व (३) • सदरच्या आक्षेपामध्ये सुवर्णजयंती नगरोत्थान योजना, वैशिष्ट्यपूर्ण योजना, वृक्ष लागवड, अनुसूचित जाती नवबौद्ध घरकुल योजना, पाणी पुरवठा योजना इत्यादीबाबत आक्षेप नोंदविले आहेत, हे खरे आहे.

• या सर्व आक्षेपा संदर्भात नगरपरिषदेने योग्य त्या स्पष्टीकरणासह महालेखापाल, नागपूर यांना अनुपालन अहवाल सादर केला असून सर्व आक्षेप वगळण्याची विनंती केली आहे.

• यासंदर्भातील महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय अद्याप प्राप्त झालेले नाहीत. दरम्यान महालेखापालांनी कळविलेल्या आक्षेपातील काही प्रकरणी सकृतदर्शनी गंभीर स्वरुपाच्या अनियमितता घडल्याचे दिसून येत असल्याने याप्रकरणी स्वतंत्रपणे प्राथमिक चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्यास जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगुर्ली परिसरात (पनवेल) हारमोनी फाऊंडेशनच्या वतीने चालविण्यात येत असलेल्या व्यसनमुक्ती केंद्रात एका तरुणाचा झालेला मृत्यु

**(३७) * १३५२९२ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख**

**(मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा (जि.ठाणे) परिसरातील कौसा येथील व्यसनमुक्ती केंद्रात मारहाणीमध्ये एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली असतानाच या घटनेची पुनरावृत्ती पनवेल येथील सांगुर्ली परिसरात हारमोनी फाऊंडेशनच्या वतीने चालविण्यात येत असलेल्या व्यसनमुक्ती केंद्रात घडली असून येथे एका तरुणाचा मारहाणीत मृत्यु झाला असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या केंद्रात उपचार घेत असलेले १८३ रुग्ण घाबरुन केंद्र सोडून निघून गेले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर केंद्राचे तीनही संचालक फरार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या केंद्राच्या संचालकांवर कारवाई करण्यासह या घटनांची अन्य केंद्रात पुनरावृत्ती होवू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई कार्यक्षेत्रातील हारमोनी फाऊंडेशन व्यसनमुक्ती केंद्र, मु.सांगुर्ली, पो.शिरढोण, ता.पनवेल या व्यसनमुक्ती केंद्रमध्ये उपचार घेणारे प्रशांत मधुकर पवार यांचा नायर रुग्णालय येथे उपचार घेत असताना दि.२३/०३/२०१९ रोजी अनैसर्गिक मृत्यू झालेला आहे.

(२) हारमोनी फाऊंडेशन व्यसनमुक्ती केंद्र, मु.सांगुर्ली, पो.शिरढोण, ता.पनवेल या ठिकाणी उपचार घेणारे सर्व रुग्ण हे त्या ठिकाणावरुन परस्पर निघून गेले आहेत.

(३) सदर प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१३६/२०१९ भादंवि कलम ३०२, २०१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचे तपासात सर्व ६ आरोपींना दिनांक १६/४/२०१९ रोजी अटक करण्यात आली आहे. नमूद आरोपी हे सध्या मा.न्यायालयाचे आदेशाप्रमाणे न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्ह्याचे तपासात निष्पन्न आरोपीतांपैकी कोणीही फरार नाहीत.

(४) पनवेल शहर पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र.१३६/२०१९ च्या गुन्ह्याच्या तपासात सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग यांना व सहायक संस्था निबंधक, रायगड विभाग यांना हारमोनी फाऊंडेशनचे नोंदणी रद्द होणेबाबत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर शहरातील मौजे-उत्तन येथे जेट्टी बांधण्याबाबत

**(३८) * १३५९७० श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर शहरातील मौजे - उत्तन येथे शासनातर्फे जेट्टी बांधण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जेट्टीचे काम सन २०१६ पासून सुरु झाले असूनसुध्दा अद्याप पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जेट्टीचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापी उत्तन पातान व भातोडी बंदर येथे मच्छिमारांना मुलभुत सोयी सुविधा पुरविण्याची कामे राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजुर आहेत.

(३) उत्तन पातान व उत्तन भातोडी बंदर येथे मच्छिमारांना मुलभुत सोयी सुविधा पुरविण्याची कामे निविदेच्या अंतिम टप्प्यामध्ये असुन महाराष्ट्र सागरी नियमन क्षेत्र प्राधिकरण यांचेकडुन ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर व बोदवड (जि.जळगांव) या नव्याने अस्तित्वात आलेल्या नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावाबाबत

**(३९) * १४१३२१ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर व बोदवड (जि.जळगांव) या नव्याने अस्तित्वात आलेल्या नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावास दिनांक २० मार्च, २०१९ पर्यंत मान्यता देण्यात यावी असा निर्णय दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री कार्यालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लवकरात लवकर कार्यवाही करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ मे, २०१९ रोजीच्या पत्रान्वये पुनश्च विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर पाणीपुरवठा योजनेस मंजूरी देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जळगांव जिल्हयातील मुक्ताईनगर व बोदवड या नवमिर्मित नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा प्रस्तावांना मार्च, २०१९ अखेर मान्यता देणेबाबतचा निर्णय फेब्रुवारी, २०१९ मध्ये शासनाकडे पार पडलेल्या बैठकीमध्ये घेण्यात आला होता.

(२) सदर अनुषंगाने कार्यवाही होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दि.०८ मे, २०१९ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे, हे खरे आहे.

(३) व (४) मुक्ताईनगर व बोदवड शहर पाणीपुरवठा योजनांचे प्रस्ताव संबंधित नगरपरिषदांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या तांत्रिक मान्यतेने नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करणे अपेक्षित आहे.

• तथापि, अद्याप मुक्ताईनगर व बोदवड शहर पाणीपुरवठा योजनांचे प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी प्राप्त झालेले नाहीत.

• सदर दोन्ही प्रकल्पांचे प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन पाठपूरावा करण्यात येत असून, प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होताच सदर प्रकल्पांच्या मंजूरीबाबतचा निर्णय तात्काळ घेण्यात येणार आहे.

-----------------

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कौसा येथील आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जागेचा टीडीआर बेकायदेशीरपणे विकून गैरव्यवहार केल्याबाबत

**(४०) * १३६०१७ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कौसा येथील जुना सर्व्हे नं.५२ पैकी नवीन सर्व्हे नं.५२/४/२ या आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जागेबद्दल मिळालेला एक लाख फुटांचा टीडीआर महानगरपालिका प्रशासनाच्या संगनमताने बेकायदेशीरपणे विकून आदिवासींची फसवणुक करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिकेच्या सुधारीत मंजूर आराखड्यानुसार मौजे कौसा येथील सर्व्हे क्र.५२/४/२ हा आर जी-५ या आरक्षणाने बाधित भुखंडाकरीता टीडीआर मिळणेचा प्रस्ताव दिनांक ०९.०७.२०१० रोजी ठाणे महानगरपालिकेकडे दाखल झाला. तसेच दिनांक ०२.०२.२०१२ च्या पत्रान्वये संबंधित भुखंडधारकाला आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या, ही वस्तुस्थिती आहे.

परंतू, उक्त भुखंडधारकाने कागदपत्रांची पुर्तता केली नसल्याने ठाणे महानगरपालिकेने सदर भुखंडावरील टीडीआर अद्याप अदा केला नाही, असे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## लोअर परळ (मुंबई) येथील कमला मिल कंपाऊंड मधील वन अबव्ह आणि मोजोस ब्रिस्ट्रो रेस्टो पबला लागलेल्या आगीबाबत

**(४१) * १४१४५३ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परळ (मुंबई) येथील कमला मिल कंपाऊंड मधील वन अबव्ह आणि मोजोस ब्रिस्ट्रो या दोन रेस्टो पबला दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी लागलेल्या आगीच्या दुर्घटनेची महानगरपालिका आयुक्तांनी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये दोन सहाय्यक आयुक्तांच्या कामकाजातील निदर्शनास आलेल्या पर्यवेक्षीय त्रुटी तसेच परवाना पत्र जारी करण्यामध्ये झालेल्या अनियमितता पडताळण्याचा दृष्टीने त्यांच्याविरुद्ध खात्याअंतर्गत सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खात्याअंतर्गत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी श्री.दिनेश महाले दुय्यम अभियंता (इमारती व कारखाने) यांनी सदर दोन्ही रेस्टो पबचे अनधिकृत बांधकाम तोडण्याची कारवाई सुरू केली असता सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण यांनी त्यांना भ्रमणध्वनीद्वारे सदर कारवाई बंद करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण यांनी दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी सदर दोन्ही रेस्टो पबचे अनधिकृत बांधकाम तोडण्याची कारवाई थांबवली नसती व सदर अनधिकृत बांधकाम त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी संरक्षण न देता निष्कासन केले असते तर दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी लागलेल्या आगीत १४ लोकांचा मृत्यू व ५४ जण जखमी झाले नसते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण यांनी दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी अनधिकृत बांधकाम तोडण्याची कारवाई थांबविली व अनधिकृत बांधकाम त्यांच्या निदर्शनास आल्यानंतरही त्याचे निष्कासन न करता मोजोस ब्रिस्ट्रो रेस्टो पबला परवाना देण्याकरिता खातरजमा न करता दिलेली मंजुरी यामध्ये दोषी असल्याचे चौकशी अहवालानुसार सिद्ध झाले आहे,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर दोषी सहाय्यक आयुक्तांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लोअर परळ येथील कमला मिल कंपाऊंडमधील वन अबव्ह आणि मोजोस ब्रिस्ट्रो या दोन रेस्टो पबला दिनांक २९.१२.२०१७ रोजी आग लागली होती.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये आढळून आलेल्या अनियमिततांबाबत सकृतदर्शनी जबाबदार असणाऱ्या २ सहाय्यक आयुक्तांसह एकूण १२ अधिकारी / कर्मचारी यांच्यावर दोषारोपपत्र बजावण्यात येऊन खात्यांतर्गत चौकशी करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२), (३) व (४) सदर दोन्ही रेस्टो पबचे अनधिकृत बांधकाम तोडण्याची कारवाई सुरू केली असता, सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण यांनी संबंधित दुय्यम अभियंता यांना भ्रमणध्वनीद्वारे सदर कारवाई बंद करण्याचे आदेश दिले होते ही बाब चौकशीमध्ये स्पष्ट झाली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकमार्फत कळविण्यात आले आहे.

(५) सहाय्यक आयुक्तांनी पर्यवेक्षीय नियंत्रण ठेवले नाही म्हणून त्यांची पुढील देय वेतनवाढ कायमस्वरुपी रोखून धरण्याचे आदेश पारित करण्यात आले असून, त्याअनुषंगाने त्यांच्यावर शिक्षादेश बजावण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निबुंत (मिरा) (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील ज्युबिलंट लाईफ सायन्सेस कंपनीत झालेली विषारी वायु गळती

**(४२) * १४१४६३ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निबुंत (मिरा) (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील ज्युबिलंट लाईफ सायन्सेस कंपनीत विषारी वायुची गळती होवुन ४८ कामगार बाधित होवून त्यापैकी श्री.संजय जगन्नाथ ढवळे या अधिकाऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना दिनांक १७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्युबिलंट लाईफ सायन्सेस कंपनीत ॲसीटिक अनहायड्राईड या टाकीतून विषारी वायू गळतीमुळे ही घटना घडली असून मानवी जीवास घातक असलेली रसायने भर लोकवस्तीत निर्माण केली जात असूनही संबंधित प्रशासनाकडून कोणतीच प्रभावी कारवाई झाली नसल्याचे निदर्शनास येत असून उत्पादन थांबविण्याचे आदेश असतांना कंपनीने उत्पादन सुरु ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीमध्ये काम करताना धोकादायक उत्पादन विभागात निमयोजने अंतर्गत काम करणाऱ्या प्रशिक्षाणार्थींना अथवा कंत्राटी कामगांराना कामावर ठेवु नये असे स्पष्ट आदेश केंद्र शासनाकडून देण्यात आलेले असतानाही सदर कंपनीमध्ये दिनांक १ जानेवारी, २०१९ व दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या औद्योगिक सुरक्षा विभागाच्या भेटीत अशा प्रकारे कंत्राटी कामगार उत्पादन विभागात काम करत असल्याचे आढळुन आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रांजणगाव (ता.शिरुर, जि.पुणे) गणपती पंचतारांकित एमआयडीसीमध्येही स्टेरिऑन प्रा.लि., ओहसंग प्रा.लि., युकेबी इलेक्ट्रानिक प्रा.लि. या कंपन्यामध्ये कॉँट्रक्ट लेबर अॅब्युलेशन अॅक्ट नुसार प्रॉडक्शनच्या ठिकाणी कॉँट्रक्ट लेबर ठेवता येत नसतानाही हजारो कंत्राटी कामगार येथे काम करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, निबुंत (मिरा) (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील ज्युबिलंट लाईफ सायन्सेस कंपनी मध्ये घडलेल्या घटनेतील दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच रांजणगाव गणपती पंचतारांकित एमआयडीसी येथील कंपन्यामध्ये कॉँट्रक्ट लेबर अॅब्युलेशन अॅक्टचे पालन होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे :** (१) होय हे खरे आहे.

दिनांक १७/०४/२०१९ रोजी कारखान्यातील अॅसेटिक अनहायड्राईड प्लांट-२ ची स्टार्ट अप प्रक्रिया सुरू असताना सायंकाळी ०४:२६ वाजताच्या सुमारास प्लांट-२ मधील ओव्हरहेड अॅसेटिक अनहायड्राईड कुलरमधून पाण्याची गळती होवून ते पाणी क्रूड अॅसेटिक अनहायड्राईड साठविण्यासाठी असलेल्या टाकीमध्ये गेल्यामुळे रासायनिक प्रक्रिया होवून टाकीच्या आतील दाब अचानकपणे वाढला, त्यामुळे टाकीचेवरील झाकण व शेल यांचा सांधा उखडून द्रवरूप क्रूड अॅसेटिक अनहायड्राईड व वायू बाहेर पडून कारखान्याच्या परिसरात उपस्थित असलेल्या ३३ कामगारांसह एकूण ५५ इसमांना डोळ्यांना चुरचुरणे व श्वसनाचा त्रास झाला. सर्व बाधीत व्यक्तींना उपचारासाठी जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपरोक्त घटनेत बाधीत कर्मचारी श्री. संजय जगन्नाथ ढवळे, वय ५६ वर्षे यांना उपचारासाठी सिद्धिविनायक हॉस्पिटल लोणंद येथे दिनांक १७/०४/२०१९ रोजी दाखल करण्यात आले. परंतु त्यांनी उपचारा दरम्यान दिनांक ०१/०५/२०१९ रोजी वैद्यकीय सल्ल्याच्या विरोधात जाऊन हॉस्पिटल मधून सुट्टी घेतली. त्यानंतर त्यांना पुन्हा अस्वस्थ वाटू लागल्याने के.ई.एम. रुग्णालय, पुणे येथे उपचारासाठी दिनांक ०२/०५/२०१९ रोजी दाखल करण्यात आले. उपचारा दरम्यान दिनांक ०७/०५/२०१९ रोजी रात्री ११:३० वाजताच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला.

(२) दुर्घटनेनंतर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिनांक २२/०४/२०१९ रोजी कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया थांबविण्याचे आदेश पारीत केले. तद्नंतर दिनांक ०२/०५/२०१९ व दिनांक १६/०५/२०१९ रोजी मंडळाकडून उत्पादन प्रक्रिया चालू करण्याची सशर्त परवानगी देण्यात आली. दिनांक २०/०५/२०१९ रोजी दुर्घटना ग्रस्त ॲसेटिक अनहायड्राईड प्लांट- २ मधील उत्पादन प्रक्रिया सुरू करण्यात आली. सदर दुर्घटनेमध्ये औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने उत्पादन प्रक्रिया थांबविण्याचे आदेश पारीत केले नव्हते. सबब उत्पादन थांबविण्याचे आदेश असतानाही कंपनीने उत्पादन सुरु ठेवले, हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

दिनांक ०५.०१.२०१९ आणि दिनांक ०८.०१.२०१९ रोजी उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कार्यक्षेत्र-३ जिल्हा-पुणे यांनी कारखान्याला भेट दिली असता केंद्र शासनाच्या NEEM योजनेअंतर्गत घेण्यात आलेले प्रशिक्षणार्थी धोकादायक उत्पादन प्रक्रियेत काम करीत असल्याचे आढळून आले.

(४) रांजणगाव गणपती (ता.शिरुर, जि.पुणे) या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील स्टेरिऑन प्रा.लि. येथे २३, ओहसंग प्रा.लि. येथे ४२०, युकेबी इलेक्ट्रॉनिक प्रा.लि. येथे २०२ कंत्राटी कामगार काम करीत असल्याचे कंत्राटी कामगार अधिनियम १९७० अन्वये ऑनलाईन प्रणालीद्वारे घेतलेल्या नोंदणी प्रमाणपत्रावरुन निदर्शनास येत आहे. उक्त आस्थापनेत कंत्राटी कामगार मुख्य उत्पादनाशी निगडीत काम करीत असल्याचे निवेदन किंवा तक्रार कामगार संघटना अथवा कामगार यांच्याकडून प्राप्त झालेली नाही.

(५) ज्युबिलंट लाईफ सायन्सेस लिमिटेड, नीरा, तालुका-बारामती, जिल्हा-पुणे या कारखान्यात दिनांक १७/०४/२०१९ रोजी घडलेल्या वायूगळती घटनेच्या चौकशी दरम्यान महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ चा नियम ६५ (४) (अे) आणि नियम ६५ (४) (सी) चे भंग आढळले असुन त्या भंगाबाबत कारखान्याच्या भोगवटादार यांचेविरुद्ध कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीतील बी.एस.यु.पी. योजनेंतर्गतच्या घरकुलांचा ताबा अद्याप लाभार्थ्यांना देण्यात आला नसल्याबाबत

**(४३) * १३७५३३ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीतील मे.जेकीन इंटरप्रायजेस व काव्या बिल्ड्कोन प्रा.लि. या एजन्सीने बी.एस.यु.पी. योजनेंतर्गत घरकुले बांधलेली असून सदर घरकुलांचा ताबा अद्याप लाभार्थ्यांना देण्यात आला नसल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील म्हाडा संभाजीनगर येथील बी.एस.यु.पी. योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या घरांमध्ये बेकायदेशीररित्या लाभार्थ्यांना वीज मीटर व पाण्याची जोडणी देण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार बी.एस.यु.पी. योजनेतील लाभार्थ्यांना घरापासून वंचित ठेवणाऱ्या तसेच बेकायदेशीररित्या लाभार्थ्यांना घरांचा ताबा, वीज मीटर व पाण्याची जोडणी देणाऱ्या नगरपरिषदेच्या, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीच्या व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे (बी.एस.यु.पी.) या केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत कुळगाव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रात १६३४ घरकुलांचे बांधकाम प्रस्तावित होते.

• मात्र प्रत्यक्षात सदर योजना राबवितांना झालेला लाभार्थ्यांचा तिव्र विरोध, जागेची अडचण, जागा बदल इत्यादी कारणांमुळे सदरहू प्रकल्पास विलंब झाला.

• सदरहू योजना सन २०१७ मध्ये बंद झाल्यामुळे त्यावेळी बांधकाम पुर्ण असलेल्या ९०४ घरकुलांवर सदर प्रकल्प सिमित करण्यात आला.

• माहे मे, २०१९ मध्ये सदर योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांकरीता मलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून सदर घरकुले रहिवास योग्य झाली आहेत.

• सद्यस्थितीत मुळ पात्र ३७४ लाभार्थ्यांची निवड यादी अंतिम करण्यात आली असून सदर लाभार्थ्यांना माहे ऑगस्ट, २०१९ अखेर घरकुले वाटप करण्यात येणार आहेत.

• गृहनिर्माण विभागाच्या दि.२५ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या निर्णयान्वये बी.एस.यु.पी  योजनेंतर्गत पात्र मुळ लाभार्थ्यांना वाटप करून उर्वरित शिल्लक घरकुले प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पात्र होणाऱ्या लाभार्थ्यास व विविध प्रकल्पामुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या कुटुंबास अनुज्ञेय करण्यात आली आहेत.

• त्यानुसार कार्यवाही सुरू असुन बांधण्यात आलेल्या संपुर्ण घरकुलांचे वाटप माहे सप्टेंबर, २०१९ अखेरपर्यत पुर्ण करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नळदुर्ग (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील नदीपात्रात बोट उलटून तीन बालकांचा झालेला मृत्यू

**(४४) * १३६१०३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नळदुर्ग (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील ऐतिहासिक किल्ला पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांची बोट उलटून झालेल्या दुर्घटनेत ३ लहान बालकांचा दिनांक २० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ऐतिहासिक वास्तूच्या ठिकाणी कोणतीही सुरक्षा नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दुर्घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मृत्यूमुखी पडलेल्या बालकांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्यासह नळदुर्ग येथील ऐतिहासिक किल्ल्याचे महत्व पाहता तेथे पर्यटकांसाठी सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने पोलिस स्टेशन नळदुर्ग गु.र.नं.क्र. ११४/१९ कलम ३०४(अ), २८० भा.द.वि. दि.२०/०४/२०१९ गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदर दुर्घटनेप्रकरणी एका व्यक्तीस अटक करण्यात आली असून पुढील तपास चालू आहे.

(२), (३), व (४) शासनाच्या "महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना" अंतर्गत नळदुर्ग किल्ला हे स्मारक युनिटी मल्टीकॉन्स प्रा.लि. सोलापूर या कंपनीस दत्तक देण्यात आलेले आहे.

सदर दुर्घटनेनंतर नळदुर्ग किल्ला परिसरमध्ये पाणी महल येथील बोटींग (नौकाविहार) तात्पुरत्या बंद करण्यात आल्या आहेत.त्याचप्रमाणे भावी काळामध्ये किल्ला परिसरात अशा प्रकारच्या दुर्घटना होऊ नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सुचना सहायक संचालक, पुरातत्व विभाग, औरंगाबाद यांनी व्यवस्थापकीय संचालक युनिटी मल्टीकॉम प्रा.लि., यांना देण्यात आल्या आहेत.

सदरची घटना हि नैसर्गिक आपत्तीत येत नाही.अशा घटनेत मयत व्यक्तीच्या नातेवाईकास आर्थिक मदत देण्याची तरतूद शासन निर्णयात नसल्यामुळे मयाताच्या नातेवाईकास मदत देण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोंढले (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील ‘प्रतिभा’ या कारखान्यातील कर्मचाऱ्यांच्या भविष्य निधीच्या रक्कमेचा संचालकांनी केलेला अपहार

**(४५) * १४१८१३ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढले (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील ‘प्रतिभा’ या लोखंडी पाईप तयार करणाऱ्या कंपनीतील सुमारे २७९ कामगारांचा भविष्यनिर्वाह निधी शासकीय कार्यालयात जमा न करता संचालकांनी सुमारे ७० लाख २३ हजार रुपयांचा अपहार केल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधीत कंपनी संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, सदरहू कंपनीतील कामगारांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम मिळवून देण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे :** (१) प्रतिभा पाईप्स अॅन्ड स्ट्रक्चरल प्रा.लि., वाडा ही भविष्य निर्वाह निधी कायद्यांतर्गत दिनांक ३०.०९.१९९७ पासून नोंदणीकृत असून कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी महा/थाणे/९६८४७ या कोड नंबर अंतर्गत जमा केला जात आहे. प्रर्वतन अधिकाराच्या दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ च्या अहवालानुसार संस्थेने फेब्रुवारी २०१७ ते सप्टेंबर २०१८ या कालावधीत भविष्य निर्वाह निधी भरलेला नाही असे आढळले आणि कामगारांच्या वेतनातून भविष्य निधी रक्कम कपात करुन भविष्य निर्वाह निधी संगठन यांच्याकडे जमा केलेली नाही.

(२) व (३) क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त-II, क्षेत्रीय कार्यालय, ठाणे (उत्तर) यांनी असा अहवाल दिला आहे की, भविष्य निर्वाह निधी प्रवर्तन अधिकारी यांनी दिनांक १८.०२.२०१९ रोजी कंपनीचे मुख्य कार्यालय चेंबुर, मुंबई येथे

जाऊन पगार पत्रक, संचालकांच्या नावे असणाऱ्या कंपनीच्या बँक खात्याची सविस्तर माहिती घेवून अहवाल सादर केला. त्यानुसार प्रर्वतन अधिकाऱ्यांनी दिनांक २०.०२.२०१९ रोजी संबंधित कार्यालयातर्फे कंपनीचे संचालकांच्या विरोधात भारतीय दंड विधान कलम ४०६/४०९ अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या वेतनातून भविष्य निधीची रक्कम कपात करुन माहे फेब्रुवारी, २०१७ ते सप्टेंबर, २०१८ पर्यंतची रक्कम रु.७०,२३,१०८/- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संगठन कडे जमा न करता स्वत: कंपनीसाठी सदर रक्कम वापरल्याने अपहार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुषंगाने वाडा पोलीस स्टेशन यांनी एफ.आय.आर. क्र.०११२, दि.१५.०४.२०१९ रोजी दाखल केला आहे. तसेच फेब्रुवारी, २०१७ ते सप्टेंबर, २०१८ च्या भविष्य निर्वाह निधी भरणा न केल्यामुळे भविष्य निर्वाह निधी कार्यालय, ठाणे द्वारा कलम ७ए अंतर्गत चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.